# 9 जानेवारी 2022 चालू घडामोडी PDF Download



**चालू घडामोडी (9 जानेवारी 2022)**

राफेल नौदलात दाखल होणार :

- भारतीय वायूदलासाठी लढाऊ विमानांची आवश्यकता लक्षात घेता 2016 मध्ये फ्रान्स देशाबरोबर 36 राफेल लढाऊ विमाने घेण्याबाबत आपण करार केला होता.

- तर आत्तापर्यंत **30 विमाने भारतीय वायूदलाच्या ताफ्यात दाखल** झाली असून उर्वरीत सहा लवकरच दाखल होणार आहेत.
- आता भारतीय वायूदलानंतर आता भारतीय नौदलही राफेल लढाऊ विमाने घेण्याबाबत चाचपणी करत आहे.
- सध्या भारताच्या नौदलाकडे **आयएनएस विक्रमादित्य** ही एकमेव विमानवाहू युद्धनौका असून यावर रशियन बनावटीची **'मिग-29 के'** जातीची लढाऊ विमाने तैनात आहेत.
- तर या वर्षी साधारण ऑगस्ट महिन्यात नौदलात स्वदेशी बनावटीची विमानवाहु युद्धनौका आयएनएस विक्रांत सेवेत दाखल होणार आहे, या युद्धनौकेच्या युद्धपातळीवर चाचण्या सध्या सुरु आहेत.
- नवी विमानवाहु युद्धनौका नौदलात दाखल होण्यासाठी सज्ज होत असून यावर कोणती लढाऊ विमाने असावी याबाबत नौदलाची चाचपणी सुरु आहे.

**Must Read (नक्की वाचा):**

[चालू घडामोडी (8 जानेवारी 2022)]

आंतरराष्ट्रीय टी-20 क्रिकेटमध्ये आला नवा नियम :

- **आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC)** आंतरराष्ट्रीय टी-20 क्रिकेटच्या प्लेइंग कंडिशनमध्ये बदल केला आहे.
- तर या अंतर्गत, गोलंदाजी संघाला कोणत्याही परिस्थितीत निर्धारित वेळेत षटकांचा कोटा पूर्ण करावा लागेल.

- जर संघ निर्धारित वेळेपेक्षा मागे राहिला, तर उर्वरित षटकांमध्ये, त्याचा एक क्षेत्ररक्षक **30 यार्डबाहेर** उभा राहू शकणार नाही. त्याला आत राहावे लागेल.
- अशा स्थितीत गोलंदाजी करणाऱ्या संघाला तोटा सहन करावा लागू शकतो.
- सध्या, **पॉवरप्लेनंतर 30 मीटर यार्ड वर्तुळाबाहेर 5 क्षेत्ररक्षक** असतात. मात्र नवीन नियमांनंतर केवळ 4 क्षेत्ररक्षक यार्डबाहेर राहू शकणार आहेत.
- याशिवाय द्विपक्षीय मालिकेतील प्रत्येक डावात अडीच मिनिटांचा ऐच्छिक ड्रिंक्स ब्रेक घेण्याचा नियमही लागू करण्यात आला आहे.
- मात्र, मालिका सुरू होण्यापूर्वी दोन्ही संघांनी सहमती दर्शवली तरच हे लागू होईल.

'नीट-पीजी'ला सर्वोच्च न्यायालयाची परवानगी :

- सर्वोच्च न्यायालयाने इतर मागासवर्गासाठी 27 टक्के आणि आर्थिक दुर्बल वर्गासाठी (ईडब्ल्यूएस) 10 टक्के आरक्षण कायम ठेवत वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेच्या (नीट-पीजी 2021) समुपदेशनास (काऊन्सिलग) अंतरिम परवानगी दिली.
- प्रवेश प्रक्रियेसाठी **'तातडीची गरज'** म्हणून हा निर्णय देण्यात येत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.
- सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे पदव्युत्तर प्रवेशाच्या प्रतीक्षेत असलेल्या अनेक डॉक्टरांना दिलासा मिळाला आहे.

दिनविशेष:

- **सन 1870** मध्ये मुंबई मधील चर्चगेट रेल्वे स्थानक सुरू झाले.
- महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री मारोतराव सांबशिव कन्नमवार यांचा जन्म **9 जानेवारी 1900** रोजी झाला होता.
- इतिहास संशोधक डॉ. गणेश हरी खरे यांचा जन्म **9 जानेवारी 1901** मध्ये पनवेल येथे झाला.
- स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी हुतात्मा स्वामी श्रद्धानंदांच्या स्मरणार्थ श्रद्धानंद साप्ताहिक **9 जानेवारी 1926** रोजी मुंबईत सुरू केले.
- **सन 1966** मध्ये भारत व पाकिस्तान यांच्यात ताश्कंद करार झाला.

## January 2022 chalu ghadamodi PDF Download

| Sr.No. | Name | Links | View PDF |
|---|---|---|---|
| 1 | 1 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 2 | 2 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 3 | 3 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 4 | 4 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 5 | 5 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download | Download PDF |

| Sr.No. | Name | Links | View PDF |
|---|---|---|---|
| 6 | 6 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 7 | 7 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 8 | 8 जानेवारी 2022 चालू घडामोडी | Download | Download PDF |

